# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**क्रीडा विभाग**



लोकमत पुणे, मंगळवार, दि. ६ नोव्हेंबर २०१८

बालेवाडी येथे ट्रॅक सायकलिंग खेळांडूसह संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

### आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : शिवछत्रपती क्रीडा संकुल (बालेवाडी) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी विद्यापीठाचे क्रीडा मंडळ प्रतिनिधी मनोहर कुंजीर, प्रा. गिरीश दमाले, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. शोभा शिंदे, सायकलिंग प्रशिक्षक दीपाली निकम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय सातपुते, दीपाली शिलदणकर उपस्थित होते.

स्पर्धेत विद्यापीठांतर्गत पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर आणि नाशिक अशा चार विभागांतून आलेल्या खेळाडूंनी भाग घेतला. स्पर्धेतून दि. ९ ते १२ नोव्हेंबर दरम्यान पतियाळा (पंजाब) येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ ट्रॅक सायकलिंग (मुले व मुली) स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संघ निवडला जाणार आहे. स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. प्रतिमा लोणारी व प्रा. योगेश मोहिते यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख